LORD
AskUsHow™



# आचार संहिता

LORD

लॉर्डमध्ये, आम्हाला कल्पकता आणि सहयोगाबाबत तळमळ आहे. अभिनव कल्पनांचे आपल्या भागधारकांसाठी दीर्घकालीन मूल्यांत रूपांतर करण्यावर आपले पूर्ण लक्ष केंद्रित आहे. सचोटी आणि उच्च नैतिक मानकांसह व्यवसाय करणे आणि कर्मचाऱ्याचा सन्मान, सुरक्षितता, आणि कल्याणावर केंद्रित कामाचे वातावरण प्रदान करणे यावर आपला विश्वास आहे.

लॉर्ड आचार संहिता आपल्या विश्वासाभोवतीची चौकट तयार करते आणि आपल्या वर्तनाबाबत स्पष्ट अपेक्षा नमूद करते. तुम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी आणि तुमच्या समोर येऊ शकतील अशा नैतिक आव्हानांचा सामना करण्यास मदत करण्याकरिता संहितेची रचना केलेली आहे. तथापि, निवड करावा लागणाऱ्या आणि निर्णय घ्याव्या लागणाऱ्या सर्व परिस्थिती संहितेमध्ये समाविष्ट केल्या जाऊ शकत नाहीत. तुम्हाला काही प्रश्न असतील किंवा अतिरिक्त मदत हवी असेल किंवा संहितेमध्ये समाविष्ट न केलेले एखादे नैतिक आव्हान तुमच्यासमोर आले तर, अपेक्षित वर्तनाबाबत तुम्हाला स्पष्ट समज येईपर्यंत, तुमच्या व्यवस्थापकास किंवा लॉर्ड कॉर्पोरेट अनुपालन समितीच्या कोणत्याही सदस्याला विचारण्यात संकोच करू नका.

आपले संचालक मंडळ, आपले ग्राहक, आपले पुरवठादार आणि इतर भागधारक आपल्याकडून सर्वोच्च पातळीवरील सचोटीने आणि संहितेतील विश्वास आणि वर्तणुकींनुसार काम करण्याची अपेक्षा करतात. लॉर्ड कार्पोरेशन आणि त्यांच्या संलग्न संस्थांतील प्रत्येक कर्मचाऱ्याने संहितेमध्ये नमूद केलेले वर्तन वाचणे, समजावून घेणे आणि त्यांचे पालन करणे आवश्यक आहे, यामध्ये संयुक्त उद्यम भागीदारांचाही समावेश होतो.

संहितेचे उल्लंघन करणाऱ्या वर्तनाबाबत तक्रार करणे हे तुमचे कर्तव्य आहे. या दायित्वाचे पालन केल्यामुळे तुमच्यावर कोणत्याही प्रकारचा सूड उगवला जाण्यास आपली धोरणे मनाई करतात. आपले जे कर्मचारी इतरांचे व्यवस्थापन करतात त्यांच्यावर या संहितेचे समर्थन करणे आणि तिचे अनुपालन करण्याबाबत अपेक्षा कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचवण्याची, तसेच संपूर्ण संस्थेमध्ये नैतिक वर्तनाची दखल घेतली जाईल, त्याला महत्त्व दिले जाईल आणि त्याचे प्रदर्शन केले जाईल अशा संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचीही त्यांच्यावर अतिरिक्त जबाबदारी आहे.

आपल्या संहितेबाबत तुमच्या वैयक्तिक वचनबद्धतेबाबत तुमचे धन्यवाद.

जेन जेम्स एफ. अमोस, युएसएमसी (निवृत्त)
अध्यक्ष
लॉर्ड कॉर्पोरेशन

एड एल. ऑस्लांडर
अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी
लॉर्ड कॉर्पोरेशन

जबाबदारी ..... 4
विश्वास ..... 4
लोक ..... 5
पर्यावरण, आरोग्य आणि सुरक्षितता ..... 5
गुणवत्ता ..... 6
व्यापार ..... 6
संघर्ष खनिजे ..... 7
शासकीय करारनामा ..... 7
अचूक बुक्स आणि रेकॉर्ड्स ..... 7
मालमत्ता आणि माहितीचे संरक्षण ..... 8
नि:पक्षपाती स्पर्धा ..... 10
हितसंघर्ष ..... 11
भेटवस्तू आणि मनोरंजन ..... 12
भ्रष्टाचार विरोधी ..... 14
व्यावसायिक भागीदार ..... 15
कॉर्पोरेट नागरिकत्व ..... 16
धोरणे व प्रक्रिया ..... 17
कॉर्पोरेट अनुपालन कार्यक्रम ..... 18

## जबाबदारी

लॉर्डची आचार संहिता ("संहिता") संयुक्त उद्यम भागीदारांच्या समावेशासह, लॉर्ड कॉर्पोरेशन आणि त्यांच्या संलग्न संस्थांच्या सर्व कर्मचाऱ्यांना लागू होते, यामध्ये चाही समावेश होतो.
संपूर्ण संहितेमध्ये, संयुक्त उद्यम भागीदारांच्या समावेशासह, लॉर्ड कॉर्पोरेशन आणि त्यांच्या संलग्न संस्थांच्या सर्व कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी "आम्ही" आणि "आमचे" वापरले आहे.
आपण संहिता समजावून घेणे आणि तिचे पालन करणे अपेक्षित आहे.
कर्मचाऱ्यांनी संहितेचे पालन करण्याबाबत आपले समर्थन आणि अपेक्षा कळवण्यासाठी अधिकारी, संचालक, व्यवस्थापक आणि पर्यवेक्षक जबाबदार आहेत.

## विश्वास

आपल्या केंद्रिय विश्वासांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो: आपल्या कर्मचाऱ्यांचा सन्मान, सुरक्षितता, आणि कल्याण; सचोटी आणि नैतिक वर्तन; आणि कल्पकता.
सचोटीने व्यवसाय करण्यावर आपला विश्वास आहे आणि आपल्या ग्राहक, कर्मचारी आणि समाजाला इतर स्वरूपांतील मूल्य प्रदान करण्याइतकीच उच्च नैतिक मानकेही महत्त्वाची आहेत.
आपल्या व्यवसायाला लागू होणारे सर्व कायदे आणि नियमनांचे पालन करण्यास आपण वचनबध्द आहोत.
भ्रष्टाचाराच्या विरोधातील युनायटेड नेशन्सच्या परिषदेचे आणि मानवाधिकार, कामगार, पर्यावरण आणि भ्रष्टाचाररोधक क्षेत्रांमध्ये केंद्रिय मूल्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या युनायटेड नेशन्स कॉम्पॅक्टच्या 10 तत्त्वांचे आपण समर्थन करतो.
http://www.unglobalcompactorg/aboutthegc/thetenprinciples/index.html



## लोक

आंतरराष्ट्रीयरित्या मान्यताप्राप्त मानवाधिकारांचे संरक्षण करणे; रोजगाराच्या निःपक्षपाती पद्धती; आणि आरोग्य, कल्याण आणि निरंतर शिक्षणास चालना देणारे सुरक्षित, आदरपूर्वक, वैविध्यपूर्ण कामाचे वातावरण प्रदान करण्यासाठी लॉर्ड वचनबध्द आहे.

- आपल्या सर्व लोकेशन्सवर, संघटना स्वातंत्र्य, खाजगीत्व, समान रोजगार संधी, बालमजुरी, कामाचे तास आणि वाजवी भरपाईचा अधिकार यांचा आदर करण्यासह, परंतु तेवढ्यासच मर्यादित नसलेल्या सर्व रोजगार आणि कामगार कायद्यांचे आपण अनुपालन करू.
- वेठबिगार आणि अनैच्छिक मजुरीस आपण प्रतिबंध करतो.
- मानवी तस्करीला आपण प्रतिबंध करतो आणि मानवी तस्करीशी लढण्यामध्ये आपण आपली भूमिका बजावू.
- आपण विरोधी किंवा धमकी देणाऱ्या कारवायांना प्रतिबंध करतो.
- आपण अवैध अंमली पदार्थ किंवा अल्कोहोलच्या प्रभावाखाली काम करण्यास प्रतिबंध करतो.
- कोणत्याही कर्मचाऱ्याचा अन्य कर्मचाऱ्याद्वारे किंवा त्रयस्थ पक्षाद्वारे छळ होण्यास आपण प्रतिबंध करतो.
- वंश, धर्म, रंग, राष्ट्रीय मूळ, वय, लिंग, लैंगिक अभिमुखता, लिंग ओळख, वैवाहिक स्थिती, आनुवांशिक माहिती, अपंगत्व स्थिती, अनुभवाची स्थिती किंवा कायद्याद्वारे संरक्षित असलेल्या कोणत्याही अन्य वैशिष्ट्यांनुसार कर्मचाऱ्यांमध्ये भेदभाव करण्यास आपण प्रतिबंध करतो.

## पर्यावरण, आरोग्य आणि सुरक्षितता

आपण व्यवसाय करत असलेल्या सर्व लोकेशन्सवर सर्व पर्यावरणीय, आरोग्य व सुरक्षेच्या कायद्यांचे पालन करण्यास आणि सुरक्षित व आरोग्यदायी कामाचे वातावरण प्रदान करण्यास लॉर्ड वचनबध्द आहे. पर्यावरणीय आव्हानांबाबत कृतीशील दृष्टिकोनाचे लॉर्ड समर्थन करते, पर्यावरणाची अधिक मोठी जबाबदारी घेण्यासाठी उपक्रम हाती घेते आणि पर्यावरण पूरक तंत्रज्ञानांच्या विकास व वितरणास प्रोत्साहन देते.

- व्यावसायिक चालनांना लागू होत असलेल्या सर्व पर्यावरणीय, आरोग्य आणि सुरक्षा कायदे आणि नियमनांचे आपण पालन करतो.
- आपण शाश्वत पद्धतींचा समावेश करू ज्या पर्यावरणावरील आपला प्रभाव कमीत कमी ठेवतील आणि सर्व सामग्रीचा पुनर्वापर करण्यास प्रोत्साहन देतील.
- कोणत्याही पर्यावरणविषयक परवानगीसाठी, मंजूरीसाठी किंवा अशा प्राधिकरणाकडे दाखल करण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही अहवालांच्या आपण संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना अचूक माहिती देऊ.
- परवाने, अनुज्ञप्ती, प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी किंवा इतर कोणत्याही पर्यावरणविषयक समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपण कोणत्याही प्रकारे अयोग्य प्रदाने करणार नाही.
- कर्मचाऱ्याला होणाऱ्या इजा व व्यवसायाशी संबंधित आजार कमीत कमी राखणाऱ्या सुरक्षा पद्धतींचा आपण वापर करू.

# गुणवत्ता

गुणवत्ता आणि मूल्याबाबत आपल्या ग्राहकांच्या अपेक्षांची सातत्याने पूर्ण करतील अशी उत्पादने आणि सेवा प्रदान करण्यासाठी लॉर्ड वचनबध्द आहे.

- ग्राहकांचे एकूण समाधान होईल, आपली गुणवत्तेबाबतची उद्दिष्टे साध्य होतील आणि सर्वोत्तम पद्धती सामायिक केल्या जातील याची खात्री करण्याचे मार्ग म्हणून आपण सातत्याने आपल्या प्रक्रियांवर देखरेख करू व सुधारणा करू.
- प्रक्रियेतील श्रेष्ठत्व आणि संपूर्ण संस्थेत चांगली गुणवत्ता राखण्याबाबत आपली अंगभूत वचनबध्दता याद्वारे आपण ग्राहकामध्ये निष्ठा निर्माण करू:
  - ग्राहकांनी आपल्या कृतीला चालना दिली पाहिजे;
  - गुंतागुंतीच्या वैशिष्ट्यांपासून ते दर्जेदार वैशिष्ट्यांपर्यंत आपण अविश्रांत लक्ष केंद्रित करतो;
  - गुणवत्ता आणि प्रक्रिया क्षमता “बांधणी” करणे;
  - जोखमीस प्रतिबंध करणे आणि ती कमीत कमी राखणे यावर लक्ष केंद्रित करणे; आणि
  - योग्य वेळी, योग्य प्रकारे, योग्य गोष्ट करणे.

# व्यापार

वस्तू व तांत्रिक डेटाची निर्यात, पुनर्निर्यात, पुनर्हस्तांतरण आणि आयातीसाठी लागू असलेल्या सर्व कायद्यांचे पालन करण्यासाठी लॉर्ड वचनबध्द आहे.

- आपला व्यवसाय आणि लोकेशन्सवर लागू होणाऱ्या सर्व व्यापार नियंत्रण कायदे आणि नियमनांचे आपण पालन करू.
- व्यापार पालन कायदे आणि नियमनांचे उल्लंघन करून आपण निर्यात, पुनर्निर्यात, पुनर्हस्तांतरण किंवा आयात करणार नाही.
- आपल्या कामाशी संबंधित व्यापार पालन धोरणे, प्रक्रिया आणि कामाच्या सूचनांचा आपण आढावा घेऊ आणि त्यांचे पालन करू.

LORD

## संघर्ष खनिजे

काँगोचे लोकशाही प्रजासत्ताक ("DRC") आणि त्यांच्या शेजारच्या देशांत सशस्त्र संघर्षाला निधी पुरवणाऱ्या संघर्ष खनिजांच्या वापराला प्रतिबंध करण्यासाठी लॉर्ड वचनबद्ध आहे.

- संघर्षाच्या स्थितींमध्ये काँगोचे लोकशाही प्रजासत्ताक आणि त्यांच्या शेजारच्या देशांतून आपल्या उत्पादनांमध्ये टँटलम, टिन, सोने, किंवा टंगस्टनपासून मिळवलेले धातू नसतील याची खात्री करण्यासाठी आपण वाजवी प्रयत्न करू.
- आपण आपल्या पुरवठादारांना सूचित करू की संघर्षाच्या स्थितींमध्ये काँगोचे लोकशाही प्रजासत्ताक आणि त्यांच्या शेजारच्या देशांतून टँटलम, टिन, सोने, किंवा टंगस्टनपासून मिळवलेले धातू असतील अशा उत्पादने आणि कच्च्या मालाच्या वापरास आपण प्रतिबंध करतो.
- मुलभूत मानवी अधिकारांचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही अस्तित्व आणि/किंवा पक्षाकडून एखादा पुरवठादार माल घेत असल्याची किंवा त्याच्याशी संलग्न असल्याची वाजवी जोखीम लॉर्ड कॉर्पोरेशनने ओळखलेली असताना आपण जाणीवपूर्वक अशा पुरवठादारांसह व्यवहार करणार नाही.

## शासकीय करारनामा

कोणत्याही देशातील शासकीय अधिकाऱ्यांसह व्यवसाय करताना लागू होणाऱ्या सर्व कायदे आणि नियमनांचे पालन करून प्रामाणिकपणा व सचोटीने काम करण्यास लॉर्ड वचनबध्द आहे.

- कोणत्याही शासनाला वस्तू किंवा सेवांची विक्री करताना लागू होणारी खरेदी धोरणे आणि लागू होणारे कायदे यांचे आपण पालन करू.
- शासकीय करार मिळवण्यासाठी आपण अयोग्य प्रदाने करणार नाही.

## अचूक बुक्स आणि रेकॉर्ड्स

स्वीकार्य लेखा पद्धती आणि लागू होणाऱ्या सर्व कायदे आणि नियमांनुसार व्यवहारांचे खरे स्वरूप प्रतिबिंबित करणाऱ्या पद्धतींनी, सर्व वित्तीय व्यवहारांची नोंद करणे लॉर्डसाठी आवश्यक आहे.

- अयोग्य व्यवहार लपविण्यासाठी आपण कोणत्याही खोट्या, दिशाभूल करणाऱ्या किंवा कृत्रिम नोंदी तयार करणार नाही.
- लॉर्ड व्यवसायाशी निगडीत विषयांबाबत आपण आपल्या अंतर्गत लेखापाल आणि स्वतंत्र लेखापालांशी सहकार्य करू.

LORD

# मालमत्ता आणि माहितीचे संरक्षण

## डेटा संरक्षण, गोपनीय माहिती आणि बौध्दिक मालमत्ता

लॉर्डच्या तसेच आपले ग्राहक, विक्रेता आणि इतर व्यावसायिक भागीदारांच्या गोपनीय आणि मालकीच्या माहितीसह बौध्दिक मालमत्तांचे संरक्षण करण्यासाठी लॉर्ड वचनबध्द आहे. कर्मचारी, ग्राहक, विक्रेते आणि इतर व्यावसायिक भागीदारांकडून संकलित केलेल्या वैयक्तिक माहितीच्या संरक्षण आणि जबाबदार वापरासाठी लॉर्ड वचनबध्द आहे.

- खाजगीत्व आणि डेटा संरक्षणाशी संबंधित लागू होणाऱ्या सर्व कायद्यांचे आपण पालन करू.
- लॉर्डच्या तसेच आपले ग्राहक, विक्रेता आणि इतर व्यावसायिक भागीदारांच्या बौध्दिक मालमत्तांचा आपण आदर करू, त्यांचे संरक्षण करू आणि त्या सुरक्षित ठेवू.
- आपण इतरांच्या बौध्दिक मालमत्ता अधिकारांचे जाणीवपूर्वक उल्लंघन करणार नाही.

## इलेक्ट्रॉनिक माहिती पत्रव्यवहार आणि सोशल मिडिया

इतर संगणक वापरकर्त्यांचे अधिकार, लॉर्ड कॉर्पोरेशन सुविधा व प्रणालींची सचोटी आणि सर्व उचीत परवाना आणि करारांचा  आदर करण्यासाठी लॉर्ड वचनबद्ध आहे. इलेक्ट्रॉनिक संसाधनांचा अयोग्य वापर केल्यामुळे कंपनी जोखमींना उघड होते, ज्यामध्ये नको असलेला संवेदनशील डेटा उघड होणे, व्हायरसचा हल्ला, नेटवर्क प्रणाली व सेवांशी तडजोड आणि कायदेशीर व अनुपालनाच्या समस्यांचा समावेश होतो.

- माहिती, इलेक्ट्रॉनिक साधने आणि नेटवर्क संसाधनांच्या योग्य वापराबाबत आपण योग्य निर्णय अंमलात आणू.
- सोशल मीडियासह संगणक आणि इंटरनेटच्या वाजवी वैयक्तिक वापराबाबत आपण योग्य निर्णय घेऊ.
- कॉपीराईट, व्यापारचिन्हे आणि इतर बौद्धिक मालमत्तेच्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याबाबतच्या सर्व कायद्यांचा आपण आदर करतो आणि सोशल मीडियावर पोस्ट करताना आपण कोणत्याही सामग्रीच्या मूळ लेखकांना श्रेय देऊ.
- लॉर्ड ऑनलाईन फोरममध्ये चर्चा करताना आपण स्वत:ला योग्यरित्या सादर करू आणि लॉर्डबरोबरील आपले संबंध उघड करू. लॉर्डचे गुणविशेष समजली जाईल अशी सामग्री पोस्ट करत असताना, आपण स्पष्ट करू की व्यक्त व्यक्त केलेला दृष्टीकोन आपला स्वत:चा आहे आणि त्यामध्ये लॉर्डचे विचार प्रतिबिंबित होत नाहीत.
- सामाजिक मीडियावर पोस्ट करत असताना आपण सहकारी कर्मचारी, ग्राहक, विक्रेते आणि इतर व्यवसाय भागीदारांचा आदर करू.

LORD

## भौतिक मालमत्ता आणि संपत्ती

आपली सुरक्षा आणि भौतिक मालमत्ता आणि संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी लॉर्ड वचनबध्द आहे. आपल्या संपत्तीचे नुकसान, चोरी, आणि गैरवापराचे व्यवसायाच्या फायदेशीरपणावर थेट परिणाम होतात. मालसुची, नोंदी, उपकरण, संप्रेषण उपकरण, संगणक आणि पुरवठा यांसारख्या घटकांचा भौतिक मालत्तांमध्ये समावेश होतो.

- आपण आपल्या सुविधांचे संरक्षण करू आणि सुविधेच्या धोरण व नियमांनुसार आवश्यक असलेल्या प्रवेश, निकास आणि बिल्ल्याच्या आवश्यकतांची पूर्तता करू.
- कर्मचारी, सुविधा, माहिती व तंत्रज्ञान या भागांच्या संरक्षणासाठी रचना केलेल्या सुरक्षा मार्गदर्शक तत्वांचे आपण पालन करू.
- आपल्या नियंत्रणातील मालमत्तांचा वापर आपण जबाबदारीने करू आणि चोरी, वाया जाणे किंवा गैरवापर होण्यापासून त्या सुरक्षित ठेवू.

## नोंदी राखणे

कागदावरील, इलेक्ट्रॉनिक किंवा इतर स्वरुपांतील किंवा मिडियातील आपल्या व्यावसायिक नोंदी लागू होणारे कायदे व नियमनांनुसार राखून ठेवणे, संग्रहित करणे आणि त्यांची मांडणी करणे याबाबत लॉर्ड वचनबध्द आहे. नोंदी राखून ठेवण्याबाबत अनुसूची आणि संबंधित नोंदी धारणा धोरणाशी सातत्य राखून कर्मचाऱ्यांनी व्यावसायिक नोंदी राखणे आवश्यक आहे.



LORD

# नि:पक्षपाती स्पर्धा

आपले पुरवठादार आणि ग्राहकांसह खुला व नि:पक्षपाती व्यवहार करण्यासाठी लॉर्ड वचनबध्द आहे. हे संबंध सचोटी, उच्च नैतिक मानकांवर आधारित असतील आणि आपल्या व्यावसायिक हितास व चालनांस लागू होणारे सर्व कायदे आणि नियमनांचे पालन करतील याची आपण खात्री करतो.

स्पर्धा कायदे सहसा स्पर्धारोधी करारांना प्रतिबंध करतात, जसे की किमती निश्चित करणे किंवा बाजारपेठा विभाजित करणे याबाबत स्पर्धकांशी सहमत होणे. काही ठराविक परिस्थितींमध्ये स्पर्धा कायद्यांचे उल्लंघन ठरू शकतील अशा अनेक पद्धती आहेत.

- आपल्या व्यावसायिक हितास व चालनांस लागू होणाऱ्या सर्व स्पर्धा कायद्यांतील अक्षरे व अर्थाचे आपण पालन करू.
- स्पर्धा कायद्यांचे उल्लंघन करून स्पर्धेवर नियंत्रण ठेवण्याचे किंवा ती मर्यादित करण्याचे कोणतेही बेकायदेशीर किंवा अनैतिक प्रयत्न आपण करणार नाही.
- अयोग्य व्यवस्था केल्याचे दिसत असलेले करार आपण टाळू.
- आपल्या स्पर्धकांसह आपण किमतींची चर्चा करणार नाही किंवा त्यांची देवाणघेवाण करणार नाही.
- प्रदेश, ग्राहक वाटून घेणे, किमती किंवा विकल्या जाणाऱ्या उत्पादनांचे नियमन यांबाबत जर स्पर्धक चर्चा करत असतील तर आपण अशा बैठकीतून त्वरित निघून जाऊ आणि लॉर्डच्या कायदा विभागाशी त्वरित संपर्क साधू.
- ज्या पद्धतींबाबत आपल्याला खात्री नसेल किंवा ज्या स्पर्धेचे उल्लंघन समजल्या जाऊ शकतात अशा पद्धतींमध्ये पुढे जाण्यापूर्वी आपण लॉर्डच्या कायदा विभागाशी संपर्क साधू.
- किंमत, गुणवत्ता, तांत्रिक नेतृत्व, विश्वसनीयता आणि पुरवठादाराची ख्याती यांसारख्या योग्य व्यावसायिक मापदंडांनुसार आपण खरेदीचे निर्णय घेऊ.
- आपल्या उत्पादनांची गुणवत्ता, वैशिष्ट्ये किंवा संभाव्य धोके आपण खरेपणाने सादर करू.
- बोलीची तयारी करणे आणि कराराच्या वाटाघाटींमध्ये आपण सत्यवादी राहू.
- आपल्या स्पर्धकांबाबत आपण खोटी विधाने करणार नाही.
- कोणत्याही अन्याय्य, दिशाभूल करणाऱ्या किंवा फसव्या व्यापारी पद्धतींमध्ये आपण सहभागी होणार नाही.
- स्पर्धकांबाबत माहिती गोळा करताना आपण लागू होणाऱ्या सर्व कायद्यांचे पालन करू.
- ग्राहक व पुरवठादारांसह असलेल्या कोणत्याही संभाव्य हितसंघर्षांबाबत आपण जागतिक अनुपालनाच्या संचालकांकडे उघड करू.

LORD

## हितसंघर्ष

खाजगी स्वारस्य किंवा संबंधांवर आधारित व्यावसायिक निर्णय न घेता वस्तूनिष्ठ मापदंडांवर घेण्यासाठी लॉर्ड वचनबध्द आहे.

एखादा कर्मचारी किंवा कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांचे स्वारस्य, कर्तव्ये, दायित्वे किंवा उपक्रम लॉर्डसाठी हितावह नसलीत किंवा कदाचित त्याच्या विरोधी असतील किंवा असू शकतील तर हितसंघर्ष निर्माण होतो.

हितसंघर्षाच्या परिस्थितींबाबत जागरूक असण्याची व त्या टाळण्याची आपल्यावर जबाबदारी आहे. संभाव्य हितसंघर्षांबाबत आपण जागतिक अनुपालनाचे संचालक किंवा मानव संसाधनाकडे उघड करणे आवश्यक आहे.

संभाव्य हितसंघर्षाची उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत:

- लॉर्डसह व्यवसाय करणाऱ्या किंवा स्पर्धा करणाऱ्या किंवा त्यासारखा उद्योगात कार्यरत असलेल्या उद्योगांमध्ये तुम्ही किंवा तुमच्या जवळच्या कुटुंबियांची मालकी आहे;
- लॉर्डसह व्यवसाय करणाऱ्या किंवा स्पर्धा करणाऱ्या किंवा त्यासारखा उद्योगात कार्यरत असलेल्या उद्योगांमध्ये तुम्ही किंवा तुमचे जवळचे कुटुंबिय रोजगारावर नियुक्त आहात;
- स्वतःचा व्यवसाय चालवणे, दुसऱ्या कंपनीसाठी काम करणे किंवा दुसऱ्या संस्थेला सल्ला आणि/किंवा व्यवस्थापन सेवा प्रदान करणे यांसारखे उपक्रम व्यावसायिक तासांमध्ये करणे.
- लॉर्डच्या व्यावसायिक हिताशी संघर्ष निर्माण करणारा दुय्यम रोजगार असणे;
- तुमचे प्रेमाचे संबंध असलेल्या व्यक्ती किंवा नातेवाईकाला नियुक्त करण्याच्या प्रक्रियेमध्ये तुमचा सहभाग असणे;
- कामाच्या अशा जबाबदाऱ्या असणे ज्यामध्ये तुमची किंवा तुमच्या जवळच्या कुटुंबियांची मालकी किंवा रोजगार असलेल्या विक्रेता, ग्राहक किंवा इतर व्यावसायिक भागीदाराचा समावेश आहे;
- तुमचे प्रेमाचे संबंध असलेल्या व्यक्ती किंवा कुटुंबातील सदस्यासह थेट रिपोर्टिंगचे संबंध असणे; आणि
- निर्णय घेण्यावर प्रभाव टाकणाऱ्या किंवा प्रभाव टाकत असल्याचे दिसणाऱ्या भेटवस्तू किंवा मनोरंजन देणे किंवा घेणे.

ही उदाहरणे संभाव्य हितसंघर्षांची संपूर्ण सूची असण्याच्या उद्देशाने नाहीत.

## भेटवस्तू आणि मनोरंजन

आम्ही ओळखतो की अनेकदा भेटवस्तू आणि मनोरंजन अनेकदा व्यावसायिक संबंध प्रस्थापित करण्याचा भाग असतात, परंतु आम्हाला याचीही माहिती आहे की भेटवस्तू आणि मनोरंजन निर्णयास प्रभावित करू शकतात किंवा करत असल्यासारखे वाटू शकते.

लाच, प्राधान्यीकृत वागणुकीसाठीची देवाणघेवाण किंवा व्यावसायिक निर्णयास प्रभावित करण्याच प्रयत्न समजला जाऊ शकतो अशा प्रकारच्या भेटवस्तू किंवा मनोरंजन देऊ करण्यास किंवा स्वीकारण्यास लॉर्ड प्रतिबंध करते.

- रोख रक्कम किंवा तत्सम स्वरूपात आपण भेटवस्तू देऊ करणार नाही किंवा स्वीकारणार नाही (यातून लॉर्ड कर्मचारी मान्यता कार्यक्रम वगळलेला आहे).
- स्थानिक मापदंड आणि रूढींनुसार वाजवी मूल्याहून जास्त किंमतीची किंवा स्थानिक कायद्यांचे उल्लंघन करणारी भेटवस्तू आपण देऊ करणार नाही.
- परंपरागत व्यावसायिक पद्धतींशी विसंगत असलेले मनोरंजन आपण देऊ करणार नाही किंवा स्वीकारणार नाही.
- लैंगिक अभिमुखता असलेले मनोरंजन आपण देऊ करणार नाही किंवा स्वीकारणार नाही.
- शर्ती संलग्न असलेल्या भेटवस्तू आपण देऊ करणार नाही किंवा स्वीकारणार नाही.
- ज्यामध्ये आपण वाटाघाटी करणार आहोत किंवा देऊ करणार आहोत अशा परिस्थितीत आपण भेटवस्तू आपण देऊ करणार नाही किंवा स्वीकारणार नाही.
- वाटाघाटी किंवा खरेदीस प्रभावित करणारे मनोरंजन आपण देऊ करणार नाही किंवा स्वीकारणार नाही.



LORD

स्वीकार्य भेटवस्तू व मनोरंजनाने खालील मापदंडांची पूर्तता केली पाहिजे:

- कायदेशीर आवश्यकतांचे पालन करून आणि व्यावसायिक संबंध आणि व्यवसायाच्या पद्धतींनुसार योग्यप्रकारे दिलेले किंवा घेतलेले;
- प्राप्तकर्त्याच्या आचार संहितेचे पालन करून दिलेले;
- लेखांकन अहवालांमध्ये अचूकपणे नोंदवलेले;
- दायित्व किंवा अपेक्षांविना दिलेले किंवा घेतलेले;
- स्पष्टपणे प्रशंसेची कृती म्हणून दिलेले किंवा घेतलेले;
- वारंवार न दिलेले किंवा घेतलेले;
- सार्वजनिकरित्या स्वीकार्य आणि योग्य मूल्याचे म्हणून समजले जाण्याची शक्यता आहे; आणि
- उघडपणे दिलेले किंवा घेतलेले.

खालील प्रकारच्या भेटवस्तू आणि मनोरंजन सहसा स्वीकार्य समजले जाते:

- किरकोळ मूल्याच्या रोखीत नसलेल्या भेटवस्तू (उदा. चॉकलेट, फळांची टोपली, फुले);
- कंपनीचे नाव किंवा उत्पादनाची प्रतिमा असलेल्या क्षुल्लक मूल्याच्या भेटवस्तू; आणि
- सार्वजनिकरित्या स्वीकार्य आणि योग्य मूल्याचे म्हणून समजले जाण्याची शक्यता आहे असे व्यावसायिक भोजन.

सामान्यत: स्वीकार्य मापदंडांची स्पष्टपणे पूर्तता न करणाऱ्या भेटवस्तू आणि मनोरंजनासाठी आपण लॉर्ड कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्याकडून पूर्वमंजूरी मिळवू आणि याबाबतचे तपशील संचालक, जागतिक अनुपालन यांना कळवू. शासकीय मालकीच्या किंवा शासकीय नियंत्रीत कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांसह, सरकारी अधिकाऱ्यांशी संवाद साधण्याबाबत विशिष्ट कायदे लागू होऊ शकतात. शासकीय अधिकाऱ्यांना देऊ केल्या जात असलेल्या भेटवस्तू व मनोरंजनाबाबत विशिष्ट मार्गदर्शनासाठी जागतिक अनुपालनाच्या संचालकांशी संपर्क साधावा.

LORD

## भ्रष्टाचार विरोधी

खंडणी आणि लाच देण्यासह सर्व प्रकारच्या भ्रष्टाचाराच्या विरोधात कार्य करण्यासाठी आणि या तत्त्वांची अंमलबजावणी आणि समर्थन करण्यासाठी एक कार्यक्रम विकसित करण्याकरिता लॉर्ड वचनबद्ध आहे.

कोणत्याही स्वरूपातील भ्रष्टाचारक किंवा लाचलुचपतीला लॉर्ड प्रतिबंध करते. व्यवसायाचा तोटा होत असला तरीही लाच किंवा सुलभीकरण प्रदाने देण्यास नकार देण्यामुळे पदावनती, दंड किंवा इतर प्रतिकूल परिणाम होणार नाहीत.

- लागू असलेले भ्रष्टाचार विरोधी कायदे आणि नियमनांचे आपण पालन करू.
- आपण कोणत्याही स्वरूपात लाच देऊ करणार नाही किंवा स्वीकारणार नाही.
- आपण सुलभीकरण प्रदाने करणार नाही.
- लाच, प्राधान्यीकृत वागणुकीसाठीची देवाणघेवाण किंवा व्यावसायिक निर्णयास प्रभावित करण्याचा प्रयत्न समजला जाऊ शकतो अशा प्रकारच्या भेटवस्तू किंवा मनोरंजन आपण देऊ करणार नाही किंवा स्वीकारणार नाही.
- लॉर्डच्या कायदा विभागाने आगाऊ मंजूरी दिली असल्याशिवाय राजकीय पक्ष किंवा उमेदवारांना लॉर्डच्या निधींचे योगदान देण्यास किंवा लॉर्डच्या मालमत्ता किंवा सुविधांचा वापर जगात कुठेही करू देण्यास प्रतिबंध आहे.

लाच म्हणजे अप्रामाणिक, बेकायदेशीर किंवा विश्वासाचा भंग करणारी एखादी गोष्ट करण्याकरिता प्रोत्साहन म्हणून एखाद्या व्यक्तीकडून किंवा व्यक्तीला कोणत्याही भेटवस्तू, कर्ज, फी, बक्षीस किंवा इतर फायदे देऊ करणे किंवा त्या व्यक्तीकडून घेणे. लाच देणे हे छुपे कमिशन, भेटवस्तू, लाभ, मदत किंवा देणगी असू शकते.

सुलभीकरण प्रदान म्हणजे एखादी अशी सामान्य कृती किंवा सेवा सुरक्षीत करण्यासाठी किंवा तिला वेग देण्यासाठी केलेले प्रदान ज्याचा सुलभीकरण प्रदान देणाऱ्याला कायदेशीर किंवा अन्य अधिकार असतो. एखादी सामान्य कारवाई करण्यासाठी, तिला वेग देण्यासाठी किंवा ती न करण्यासाठी पैशांची मागणी करण्याकरिता एखादी व्यक्ती सत्तेचा (एखादी सामान्य कृती किंवा सेवा पार पाडण्याचा अधिकार) वापर करते तेव्हा सुलभीकरण प्रदाने घडतात.

सुलभीकरण प्रदानांच्या विनंत्या सर्वात सामान्य असल्याची काही उदाहरणे खाली सूचीबद्ध केलेली आहेत:

- परवाने, अनुज्ञप्ती किंवा इतर अधिकृत कागदपत्रे मिळवणे;
- सरकारी कागदपत्रांवर प्रक्रिया करणे (उदा. व्हिसा, कामाचे आदेश);
- पोलीस संरक्षण, टपाल नेणे आणि पोहोचवणे;
- कराराची कामगिरी किंवा एका देशातून दुसऱ्या देशात वस्तू पाठवण्याशी संबंधित तपासण्या अनुसूचित करणे;
- फोन सेवा, वीज आणि पाणी पुरवठा;
- कार्गो चढवणे व उतरवणे किंवा नाशवंत उत्पादने किंवा वस्तू खराब होण्यापासून त्यांचे संरक्षण करणे; आणि
- सीमाशुल्क निष्कासन.

## व्यावसायिक भागीदार

- व्यावसायिक भागीदार म्हणजे एजंट्स, वितरक, प्रतिनिधी, सल्लागार, कंत्राटदार, वाहणावळ पुढे पाठवणारे आणि लॉर्डच्या वतीने कार्य करणारे इतर. व्यवसाय भागीदार हे लाच देण्याचे सर्वात सामान्य मार्ग आहेत. जेव्हा एखादी कंपनी अयोग्य प्रदाने करण्यासाठी हेतूपूर्वक व्यावसायिक भागीदारांचा वापर करते किंवा जेव्हा एखादा व्यावसायिक भागीदार आपली कंत्राटी दायित्वे साध्य करण्यासाठी अयोग्य प्रदाने करतो तेव्हा हे घडते. व्यावसायिक भागीदारांद्वारे केल्या जाणाऱ्या अयोग्य प्रदानांना लॉर्ड प्रतिबंध करते.
- आपल्या व्यावसायिक भागीदारांनी लॉर्डच्या व्यावसायिक भागीदाराच्या आचार संहितेचे पालन करणे आपल्यासाठी आवश्यक आहे.
    - https://www.lord.com/business-partner/code-of-conduct
- आपल्या व्यावसायिक भागीदारांबाबत आपण योग्य व्यासंग पार पाडू.
- व्यावसायिक भागीदारांसह केल्या जाणाऱ्या लेखी करारांमध्ये आपण भ्रष्टाचाररोधी तरतुदींचा समावेश करू.



## कॉर्पोरेट नागरिकत्व

कॉर्पोरेट नागरिकत्व तीन मुख्य विश्वासांवर आधारित असते — आपल्या लोकांचा सन्मान, सुरक्षितता आणि कल्याणामध्ये; निरंतर कल्पकतेमध्ये; आणि सचोटी आणि नैतिक वर्तनामध्ये — कामगिरीची हमी, शाश्वतता आणि जबाबदार नेतृत्वाबद्दलच्या आपल्या वचनबध्दतांद्वारे हे व्यक्त केले जाते.

ही वचनबद्धता एका अशा टिकाऊ व शाश्वत व्यवसायाची पायाभरणी करते ज्यामुळे आपण आपल्या ग्राहकांसाठी, आपल्या भागधारकांसाठी, आपल्या कर्मचाऱ्यांसाठी आणि ज्या समुदायांमध्ये आपण कार्य करतो त्याकरिता टिकाऊ मूल्य निर्माण करू शकतो. या तीन क्षेत्रातील आपल्या वचनबद्धतेमुळे आपले ग्राहक आणि इतर महत्त्वाच्या बाह्य भागधारकांबाबत आपण यशस्वी होऊ शकतो आणि त्यामुळे आपल्या व्यावसायिक ध्येयांना आधार मिळतो. आमचा असा विश्वास आहे की आपण ज्या समाजात काम करतो आणि राहतो त्या समाजात आपले कॉर्पोरेट नागरिकत्व उपक्रम सकारात्मकरित्या योगदान देतात आणि जागतिक वाढीची आपली दीर्घकालीन उद्दिष्टांच्या दिशेने प्रगती करण्यात, आपल्या पारंपारिक बाजारपेठेच्या पलीकडे जाऊन विस्तार करण्यात, आपल्या ग्राहकांची कामे अधिक सुलभ बनविण्यात, आपल्या उत्पादनांतील सुधारणा सातत्याने वाढवत नेण्यात आणि आपल्या कर्मचाऱ्यांना एका सतत बदलणाऱ्या आणि गुंतागुंतीच्या जागतिक अर्थव्यवस्थेत यशस्वी होण्यात मदत करतात.

आपल्या कॉर्पोरेट नागरिकत्व कार्यक्रमाबाबत अतिरिक्त माहिती येथे उपलब्ध आहे https://www.lord.com/our-company/corporate-citizenship.

## धोरणे व प्रक्रिया

आपल्या भूमिका व जबाबदाऱ्यांना लागू होत असलेल्या सर्व धोरणांचे व प्रक्रियांचे आपण पालन करू. आपल्या संहितेमध्ये निश्चित केलेल्या वचनबध्दतांचे समर्थन करणाऱ्या धोरणांची सूची खाली दिली आहे.

- 14-64 कार्यबळ विविधता
- 10-71 कार्यस्थानी हिंसाचारास प्रतिबंध व प्रतिसाद कार्यक्रम
- 14-81 अंमली पदार्थ व अल्कोहोलमुक्त कार्यस्थान
- 14-83 कर्मचारी वर्तन
- 14-94 छळ
- 10-51 पर्यावरण, सुरक्षा आणि आरोग्य
- 10-57 गुणवत्ता व्यवस्थापन
- 10-63 जागतिक व्यापार अनुपालन- निर्यात आणि आयात अनुपालन प्रशासन आणि लॉर्ड निर्यात नियंत्रण माहिती पुस्तिका
- 15-53 गोपनीय माहिती आणि व्यापारी गुपितांचे संरक्षण
- 10-69 प्रवास सुरक्षा कार्यक्रम
- 15-57 इलेक्ट्रॉनिक माहिती आणि संवाद
- 18-01 इलेक्ट्रॉनिक संसाधनाचां स्वीकार्य वापर
- 18-03 माहिती सुरक्षा
- 16-53 सोशल मिडिया धोरण
- 10-55 खरेदी चालन
- 14-70 जवळच्या कौटुंबिक सदस्य/नात्यातील व्यक्तीचा रोजगार
- 308 व्यावसायिक भागीदार योग्य व्यासंग
- 10-56 कॉर्पोरेट योगदाने



## कॉर्पोरेट अनुपालन कार्यक्रम

कॉर्पोरेट अनुपालन कार्यक्रमाची (कार्यक्रम) निर्मिती एका अशा संघटनात्मक संस्कृतीचा प्रचार करण्यासाठी केली गेली जी सचोटी, नैतिक वागणूक, आणि आपल्या व्यवसायाला लागू असलेल्या सर्व कायदे आणि नियमनांचे अनुपालन करण्यास प्रोत्साहन देते आणि व्यवसायातील गैरवर्तनास प्रतिबंध करते, ते शोधते आणि त्यावर उपाय शोधते.

कार्यक्रमाच्या सनदीमध्ये ओळखलेले मुख्य घटक आहेत:

- कार्यक्रमाची सनद
- वरिष्ठ व्यवस्थापनाद्वारे वचनबध्दता आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात एक स्पष्टपणे सांधलेले धोरण
- आचार संहिता आणि अनुपालन धोरणे व प्रक्रिया
- नजरचूक, स्वायत्तता आणि संसाधन
- जोखीम मूल्यांकन
- प्रशिक्षण आणि निरंतर सल्ला
- शिस्तबद्ध उपाययोजना आणि भत्ते
- त्रयस्थ पक्ष योग्य व्यासंग आणि प्रदाने
- गोपनीय अहवाल देणे आणि अंतर्गत अन्वेषण
- निरंतर सुधारणा: नियतकालिक चाचणी आणि पुनरावलोकन
- विलिनिकरणे आणि ताबा घेणे: ताबा घेण्यापूर्वीचा योग्य व्यासंग आणि ताबा घेतल्यानंतरचे एकत्रीकरण

कार्यक्रमाच्या सनदीमध्ये (https://lordcorp.sharepoint.com/sites/LORDweb/globalcorporatecompliance/lordcomplianceprogramcharter) सर्व प्रमुख घटकांचे वर्णन समाविष्ट आहे.

## कॉर्पोरेट अनुपालन समिती

कॉर्पोरेट कॉम्प्लेन्स कमिटी (समिती) ची स्थापना भगवान कॉरपोरेशनच्या विश्वासांनुसार कार्यक्रम प्रयत्नांना संरेखित करण्यासाठी आणि कार्यक्रमांच्या प्रभावाचा मूल्यांकन करण्यासाठी करण्यात आली. समितीमध्ये प्रमुख एचआर आणि एंटरप्राइज सिस्टम अधिकारी, मुख्य कायदेशीर अधिकारी, संचालक, जागतिक अनुपालन यांचा समावेश आहे; आणि संचालक, अंतर्गत लेखापरीक्षण.

समितीचे सदस्य तपासांबाबत निरीक्षण नोंदवतात आणि कर्मचाऱ्यांना आपल्या समस्यांबाबत तक्रार करता यावी यासाठी संसाधने म्हणून कार्य करतात, कार्यक्रमाविषयी प्रश्न विचारतात, नैतिक दुविधांशी संबंधित मार्गदर्शनाची विनंती करतात आणि कायदे, नियमने किंवा स्वीकार्य व्यावसायिक पद्धती जर अज्ञात, अस्पष्ट, गोंधळात टाकणाऱ्या किंवा समजण्यास कठीण असतील तर अशा कोणत्याही परिस्थितीत सल्ला मागतात.

## प्रशिक्षण

आपले विश्वास, संहिता आणि कार्यक्रमांना पाठिंबा देण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी लॉर्ड वचनबद्ध आहे. वार्षिक पातळीवर, अनुक्रमे कर्मचारी व लॉर्ड संचालक मंडळ आणि  व्यावसायिक भागीदारांनी संहितेबाबत समज आणि अनुपालनाची पुष्टी करणे आवश्यक आहे. वार्षिक पातळीवर कर्मचाऱ्यांनी नैतिक प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांसाठी योग्य ते अतिरिक्त शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रम लॉर्ड्स सतत विकसित करते आणि त्याची अंमलबजावणी करते. ग्लोबल अनुपालनाने नेमून दिलेले सर्व प्रशिक्षण कर्मचाऱ्यांनी पूर्ण करणे आवश्यक आहे.

## अहवाल देणे

उल्लंघनांबाबत कळवणे, मार्गदर्शन घेणे आणि अभिप्राय देणे यासाठी कर्मचाऱ्यांना प्रभावी तक्रार करण्याच्या पद्धती प्रदान करण्यासाठी लॉर्ड वचनबद्ध आहे.

- संहिता, लॉर्डची धोरणे आणि प्रक्रिया व लॉर्डच्या व्यावसायिक उपक्रमांना लागू असलेल्या कायदे व नियमनांचे प्रत्यक्ष किंवा संशयित उल्लंघन होत असल्यास त्याबाबत आम्ही तत्परतेने कळवू.
- कायदे, नियमने किंवा स्वीकार्य व्यावसायिक पद्धती जर अज्ञात, अस्पष्ट, गोंधळात टाकणाऱ्या किंवा समजण्यास कठीण असतील तर अशा कोणत्याही परिस्थितीत आम्ही समितीकडून सल्ला घेऊ.
- स्थानिक कायदे जर संहितेच्या विरोधात असतील तर आम्ही समितीकडून सल्ला घेऊ.

लॉर्ड नितीमत्ता हॉटलाइन (हॉटलाइन) ही एक साधी, सुरक्षित आणि गोपनीय यंत्रणा आहे जी तक्रार करण्यासाठी सर्व कर्मचारी आणि व्यावसायिक भागीदारांसाठी उपलब्ध आहे. लॉर्डने एका अशा बाह्य कंपनीसह भागीदारी केली आहे जी नैतिक चिंता हॉटलाइनला कळविण्यासाठी स्वतंत्र पद्धती प्रदान करण्यात तज्ज्ञ आहे. आरोप आणि तपासाच्या प्रवृत्तींची तक्रार करणे व विश्लेषण करणे यासाठी वापरल्या जाणाऱ्या मुख्य माहितीची हॉटलाइन हे एक केंद्रिय भांडार आहे. कोड https://lord.com/LORDHotline वरून किंवा संकेताच्या समाप्तीवर सूचीबद्ध केलेल्या दूरध्वनी क्रमांकाचा वापर करून कर्मचारी हॉटलाइनमध्ये प्रवेश करू शकतात.

संशयास्पद उल्लंघनांच्या तक्रारी, प्रश्न, सल्ल्यासाठी विनंती किंवा सुधारणांसाठीच्या सूचना खालीलपैकी कोणत्याही मार्गाने सादर केल्या जाऊ शकतात:

- पर्यवेक्षक, व्यवस्थापक, संचालक, अधिकारी;
- समितीचे सदस्य;
- मानव संसाधन;
- जागतिक अनुपालन;
- कायदा विभाग; आणि
- हॉटलाइन.

पर्यवेक्षक, व्यवस्थापक, संचालक, अधिकारी, मानव संसाधन, आणि अहवाल प्राप्त करणारा लॉर्डचा कायदा विभाग यांनी समितीच्या सदस्यास किंवा हॉटलाइनद्वारे तत्परतेने अहवाल कळवला पाहिजे.

## तपास

संशयास्पद किंवा तक्रार केलेल्या गैरवर्तनाची सन्माननीय, गोपनीय आणि निष्पक्ष चौकशी करण्यासाठी लॉर्ड वचनबद्ध आहे. समिती तपासांबाबत निरीक्षण प्रदान करते. हॉटलाइनद्वारे अहवाल प्राप्त झाल्यावर समितीला सूचना मिळते. कोणत्याही कंपनी विशिष्ट धोरण किंवा नियमांच्या तसेच लॉर्डच्या व्यावसायिक उपक्रमांना लागू होणाऱ्या कायदे व नियमनांचे उल्लंघन झाल्यास त्यास योग्य प्रतिसाद देण्यासाठी आणि पुढील उल्लंघने रोखण्यासाठी समिती वाजवी पावले उचलते. तपास संयोजित करणे, तपास प्रक्रियेचा समन्वय साधणे आणि अहवाल व तपासा संबंधित आकडेवारी प्रदान करण्यासाठी एक मानक प्रक्रिया स्थापित करून तिची देखभाल करण्यासाठी जागतिक अनुपालन संचालक जबाबदार आहेत.

LORD

संभाव्य उल्लंघनाबाबत तक्रार आली किंवा तसे आढळले तर, माहितीचे परीक्षण करून आणि प्रस्थापित तपास प्रक्रिया वापरून, वास्तविक उल्लंघन झाले आहे का हे निर्धारीत करण्यासाठी, समिती किंवा तिचे प्रतिनिधी योग्य व वाजवी पावले उचलतात आणि शिस्तभंग किंवा उपायात्मक उपाययोजनांसह मिळालेल्या प्रतिसादाची कागदोपत्री नोंद करतात. तपासादरम्यान कर्मचाऱ्यांनी सहकार्य करणे व सत्य बोलणे आवश्यक आहे.

## सूड घेणे

कायद्याचे किंवा संहितेचे संभाव्य उल्लंघन झाल्याबाबत कळवणाऱ्या किंवा तपासात सहभागी झालेल्या लोकांविरुद्ध सूड घेण्यास लॉर्ड प्रतिबंध करते. सूड घेतल्याच्या अहवालांचा तपास केला जाईल. सूड घेतला गेल्यास कर्मचाऱ्यांनी समितीच्या सदस्यास किंवा हॉटलाइनच्या माध्यमातून तक्रार करावी.

## शिस्तभंगाची कारवाई

या कार्यक्रमाचा संपूर्ण संस्थेमध्ये सातत्याने प्रचार केला जातो व अंमलातही आणला जातो. नोकरीवरून काढून टाकण्यासह, परंतु तेवढ्यासच मर्यादित नसलेल्या योग्य त्या शिस्तभंगाच्या कारवाईसह लॉर्ड अनुपालनाच्या विनंत्या अंमलात आणते.

भौतिक धोरणांचे उल्लंघन लेखापरीक्षणाचे अध्यक्ष आणि लॉर्ड कॉर्पोरेशनच्या वित्त समितीच्या अध्यक्षांच्या निदर्शनास आणले जाईल.



| देश | क्रमांक |
|---|---|
| ब्राझिल | 0800.892.2299 |
| कॅनडा | 1.800.235.6302 |
| चीन | 400.120.3062 |
| फ्रान्स | 0805.080339 |
| जर्मनी | 0800.181.2396 |
| हाँगकाँग | 800.906.069 |
| भारत | 000.800.100.4175, 000.800.100.3428 |
| इंडोनेशिया | 62.21.29758986 |
| इटली | 800.727.406 |
| जपान | 0800.170.5621 |
| कोरिया (दक्षिण) | 080.808.0574 |
| मलेशिया | 60.1548770383 |
| मेक्सिको | 01.800.681.6945 |
| सिंगापूर | 800.852.3912,  001.800.1777.9999 |
| स्विझर्लंड | 0800.838.835 |
| तैवान | 00801.14.7064 |
| थायलंड | 1.800.012.657, 001.800.1777.9999 |
| युनायटेड किंगडम | 0.808.189.1053 |
| युनायटेड स्टेट्स | 800.461.9330 |

कर्मचारी आणि इतरांद्वारे अपेक्षित आणि/किंवा निषिद्ध वर्तनाचा परिपूर्ण इलाज असण्याच्या हेतूने संहिता नाही. तसेच, लॉर्ड आणि त्यांचे कर्मचारी, संयुक्त उद्यम भागीदार आणि संचालक मंडळाचे सदस्य यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही पक्षासाठी कोणतेही अधिकार देण्याच्या हेतूने संहिता नाही किंवा तसे करणार नाही.